(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३-अ/१०/जीटी-२४/ { पो.उ.नि. ( से.क्ला.मा.)} /२४/२०२४ मुंबई, दिनांक :- २४ /०६/२०२४

वाचा:- १. महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१

२. पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दिनांक२४/०६/२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त.

## आदेश

महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ मधील कलम २२ न (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी **विहीत कालावधी पूर्ण न झालेल्या** पोलीस उप निरीक्षक ( सेकंड क्लास मास्टर) यांच्या विनंतीचा सांगोपांग विचार करून, विशेष बाब म्हणून त्यांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे बदलीचा निर्णय घेण्यात आला आहे:-

| अ.क्र. | पोलीस उप निरीक्षक ( सेकंड क्लास मास्टर) यांचे नांव | सध्याची नेमणुक | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | बाबुराव चंद्रकांत केळुसकर | रत्नागिरी | मुंबई शहर |
| २. | विज्ञान मधुकर दाभोळकर | बृहन्मुंबई | रत्नागिरी |
| ३. | भास्कर पांडुरंग अंधेरे | सिंधुदुर्ग | मिरा-भाईंदर वसई-विरार |

२. संबंधीत घटक प्रमुखांनी या बदली आदेशाची प्रत संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना तात्काळ बजावून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. बदली झालेल्या अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करताना पर्यायी / बदलीवर येणाऱ्या अधिकाऱ्यांची वाट पाहू नये.

३. मा.न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. बदली आदेशानंतर जे पोलीस अधिकारी रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

५. घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात हजर झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे व त्यांच्या घटकातून बदली ठिकाणी कार्यमुक्त केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे हजर झालेल्या / कार्यमुक्त केलेल्या दिनांकासह या कार्यालयास कळवावीत. जे पोलीस अधिकारी बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही वेळेत बदलीवर हजर होणार नाहीत, अशा पोलीस अधिकाऱ्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवून त्यांच्याविरुद्ध घटक प्रमुखांनी शिस्तभंगविषयक कार्यवाही तातडीने सुरु करावी. सदरची माहिती या कार्यालयातील लक्षवेध:- कार्यासन क्रमांक ३-अ यांना ई ऑफिस / ई-मेल द्वारे [desk३a.dgoffice@mahapolice.gov.in] पाठवावी.

**( संजीव कुमार सिंघल )**

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरीता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग,

पोलीस आयुक्त, मिरा- भाईंदर वसई-विरार

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षत्र, नवी मुंबई / मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे

पोलीस अधीक्षक, रत्नागिरी / सिंधुदुर्ग

**प्रत सविनय सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह),
गृहविभाग, महाराष्ट्र शासन, २ रा मजला, मुख्य इमारत,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ३२.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:-**

कार्यासन अधिकारी, का. क्र. ९, ११, ३६ व ४० (पोमसं कार्यालय).

**प्रत,**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोमसं कार्यालय, मुंबई.

२/- यांनी सदरचे आदेश विहित कालावधी पूर्ण न झालेल्या पोलीस उप निरीक्षक ( सेकंड क्लास मास्टर ) यांची बदली-२०२४ (Tenure Not Complet Police Sub Inspectors (Second Class Master) Transfer-२०२४) या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.